
# समाजसुधारक


















# गोपाळ गणेश आगरकर
# (1856 -1895)



- जन्म: 14 जुलै 1856, टेंभू (ता. कराड, जि. सातारा) येथे ब्राह्मण कुटुंबात.
- वडिलांचे नाव : गणेश,
- आईचे नाव : सरस्वतीबाई

- शिक्षण : प्राथमिक शिक्षण कराड येथे पूर्ण केले.  कराड येथे काही काळ मुन्सफ कोर्टात कारकूनी केली.
- कराड येथे काही काळ कंपौंडरची नोकरी केली.
- 1875 : मॅट्रिक परीक्षा अकोला येथून उत्तीर्ण.

- 1877 :  यशोदाबाई यांच्याशी विवाह झाला.
- 1878: डेक्कन कॉलेज, पुणे येथून बी. ए. उत्तीर्ण.
- 1880: इतिहास व तत्त्वज्ञान हे विषय घेऊन एम. ए. उत्तीर्ण.

# शैक्षणिक सुधारणा

- 1 जानेवारी 1880: लो. टिळक, विष्णूशास्त्री चिपळूणकर यांच्या सहाय्याने आगरकरांनी पुण्यात न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली.  आगरकरांनी न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षकाची नोकरी पत्करली.
- 1884: पुणे येथे डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या स्थापनेत पुढाकार.

- या संस्थेच्या वतीने 1885 या वर्षी पुणे येथे फर्ग्युसन कॉलेजची स्थापना.
- फर्ग्युसन कॉलेजमध्ये आगरकर इतिहास व तर्कशास्त्र हे विषय शिकवत असत.
- 1892: फर्ग्युसन कॉलेजच्या प्राचार्यपदी आगरकरांची निवड.

# आगरकरांची विचारसरणी :

- **बुद्धिप्रामाण्यवाद** : स्वतःच्या बुद्धिला पटेल ती गोष्ट दुसऱ्यांना पटली नाही तरी ती करणे आणि स्वतःच्या बुद्धिला न पटणारी गोष्ट जगाला मान्य असली तरी न करणे हा आगरकरांचा बुद्धिप्रामाण्यवाद होता.
- व्यक्तीसाठी समाज असतो, समाजासाठी व्यक्ती नव्हे हे आगरकरांचे तत्त्व होते.

- व्यक्तीच्या विकासासाठी विचार, व्यवसाय व विवाह यांचे स्वातंत्र्य हवे.
- बालविवाहला विरोध करताना आगरकरांनी स्त्री-पुरुषांनी एकमेकांच्या पसंतीने विवाह करावेत असे ठामपणे सांगितले.

- महाराष्ट्र बालविवाह निषेधक मंडळीची स्थापना केली.
- मुलाच्या विवाहाचे वय 16 ते 17 वर्ष व मुलीच्या विवाहाचे वय 10 ते 12 वर्षांपेक्षा कमी असू नये यासाठी कायदा केला पाहिजे असे आगरकरांनी सांगितले.

# पत्रकारिता:

- 1881 : लोकमान्य टिळकांनी 'केसरी' व 'मराठा'ही वृत्तपत्रे सुरू केली.
- 1881-1887 या काळात केसरीचे पहिले संपादक म्हणून आगरकरांनी काम पाहिले.
- लोकमान्य टिळक हे 'मराठा' या इंग्रजी भाषेतील वृत्तपत्राचे संपादक होते.

- 1887 : लोकमान्य टिळकांशी वाद झाल्याने आगरकरांनी केसरीच्या संपादक पदाचा राजीनामा दिला.
- 1888 : 'सुधारक' हे स्वतःचे साप्ताहिक मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांत सुरू केले.
- 'सुधारक' साप्ताहिकाच्या मराठी आवृत्तीचे संपादक गो. ग. आगरकर तर
- इंग्रजी आवृत्तीचे संपादक गोपाळ कृष्ण गोखले.

- वऱ्हाड समाचार (अकोला) या पत्रात आगरकरांनी काही काळ लेख लिहिले.

# आगरकरांचे प्रसिद्ध लेख

1) इष्ट असेल ते बोलणार व साध्य असेल ते करणार

2)हिंदुस्थानचे राज्य कोणासाठी?

3) स्त्रियांनी जाकिटे घातलीच पाहिजेत

4) सामाजिक सुधारणेशिवाय राजकीय चळवळ निरर्थक

5)म्युनिसिपल हौद व ब्राह्मण्यावर गदा

6)वाचाल तर चकित व्हाल (निंबध)

7) शहाण्यांचा मूर्खपणा

8) अलंकार मीमांसा

9)दारूबाजी

10)पाचजण्याचा हंगाम

11) धर्माचा सुकाळ आणि बकऱ्याचा काळ

12) प्रेतक्रिया व प्रेतसंस्कार

## आगरकरांचे साहित्य:

1) डोंगरीच्या तुरुंगातील आमचे 101 दिवस

2)विकारविलसित

3) गुलामगिरीचे शस्त्र

4) वाक्यमीमांसा

5) वाक्याचे पृथकरण

6) केसरीतील निवडक निबंध

7) सुधारकातील वाचक लेख

- आगरकरांच्या जीवनावर प्रभाव टाकणारे व्यक्ती : जॉन स्टुअर्ट मिल व हर्बर्ट स्पेन्सर
- निधन : वयाच्या अवघ्या 39 व्या वर्षी दम्याच्या विकाराने आगरकरांचे निधन(17 जून 1895)



# आचार्य बाळशास्त्री जांभेकर

# (1812 ते 1846)

- जन्म :  6 जानेवारी 1812 ,पंभुर्ले (रत्नागिरी)
- मराठी वृत्तपत्राचे जनक ,प्रसिद्ध शिक्षणतज्ञ, आद्य इतिहास संशोधक म्हणून जांभेकरांना ओळखले जाते.
- संस्कृत मराठी इंग्रजी कानडी गुजराती बंगाली फारशी इत्यादी भाषा त्यांना अवत होत्या .प्राध्यापक अर्लीबार यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी गणित व ज्योतिषशास्त्र या विषयावर प्रभुत्व मिळवले

- बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या संस्थेत डेप्युटी सेक्रेटरी म्हणून काम पाहिले
- सरकारच्या वतीने अक्कलकोटच्या युवराज यांचे शिक्षक म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली होती
- मुंबईतील एल्फिन्स्टन महाविद्यालयात असिस्टंट प्रोफेसर म्हणून त्यांनी अध्यापन केले.

- मुंबई भागात प्राथमिक शाळा तपासणी निरीक्षक म्हणून काम पाहिले
- एल्फिन्स्टन महाविद्यालयात गणिताचे पहिले असिस्टंट प्रोफेसर म्हणून काम केले
- पाठ्यपुस्तकांची निर्मिती करून महाराष्ट्रात शिक्षणाचा खऱ्या अर्थाने पाया घातला त्यांनी इतिहास भूगोल व्याकरण गणित नीतिशास्त्र या विषयावर पाठ्यपुस्तके तयार केली

- शिक्षणामुळे आपला राजकीय सांस्कृतिक व आर्थिक विकास होतो असे जांभेकरांचे मत होते
- कुलाबा वेधशाळेचे संचालक म्हणूनही त्यांनी काम पाहिले
- हिंदू धर्माबद्दल त्यांना अभिमान होता जे कोणी हिंदू धर्म सोडून इतर धर्म परिवर्तन धर्मांतर केले होते त्या लोकांना पुन्हा व धर्मात आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले

- त्यांची जस्टिस ऑफ फीस म्हणून नेमणूक करण्यात आली
- 1832 यावर्षी दर्पण हे मराठी भाषेतील पहिले साप्ताहिक त्यांनी सुरू केले
- जांभेकरांना 'मराठी वृत्तपत्राचे जनक' असे म्हटले जाते.

- दर्पण हे पश्चिम भारतातील पहिले इंग्रजी व मराठी वृत्तपत्र होते.
- दर्पण पुढे आठ वर्ष सुरू राहिले. 20 जून 1840 रोजी या वृत्तपत्राचा शेवटचा अंक निघाला. त्यानंतर हे पत्र लिमिटेड सर्व्हिस गॅझेट अँड लिटररी क्रॉनिकल या पत्रात विलीन केले गेले.

- हे वृत्तपत्र इंग्रजी व मराठी दोन्ही भाषेत होते. ते आठ पृष्ठांचे होते व त्याची वार्षिक वर्गणी सहा रुपये होती.
- 1840 यावर्षी दिग्दर्शन हे मासिक सुरू केले

# प्रसिद्ध ग्रंथ

1) शून्यलब्धी

2)हिंदुस्तानचा इतिहास

3)हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास

3)सार संग्रह

4)इंग्लंडचा इतिहास

5) भूगोल विद्या

6) बाल व्याकरण

7) नीतिकथा

# दादोबा पांडुरंग तर्खडकर (1814 ते 1882)



- दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी सामाजिक व धार्मिक सुधारणांचा पुरस्कार केला.
- आधुनिक ज्ञान व विज्ञानाशिवाय समाजाची प्रगती होणे शक्य नाही, हे तत्त्व त्यांनी समाजाला पटवून दिले.
- जन्म: 9 मे 1814, मुंबई
- शिक्षण पूर्ण केल्यानंतर काही काळ जावरा संस्थानच्या नबाबाचे शिक्षक.

- सुरत येथे एल्फिन्स्टन संस्थेत शिक्षकाची नोकरी केली
- 1846: ट्रेनिंग कॉलेजच्या संचालकपदी नियुक्ती.
- 1852 : मध्ये नगर येथे डेप्युटी कलेक्टर म्हणून कार्य करताना भिल्लांच्या बंडाचा यशस्वी बीमोड केला.
- दादोबांच्या कार्याची दखल घेऊन ब्रिटिश सरकारने त्यांना 'रावबहादूर' ही पदवी दिली.

# सामाजिक व धार्मिक सुधारणा

- 1844 : मानवधर्म सभेची स्थापना
- दुर्गाराम मंछाराम, दिनमणी शंकर दलपतराय यांच्या सहकार्याने दादोबांनी समाजातील दोष व उणीवा दूर करण्यासाठी सुरत येथे ही संस्था स्थापन केली.
- कार्यकर्त्यांची संख्या कमी असल्याने ही संस्था लगेच बंद झाली.

- 1848 ज्ञानप्रसारक सभा मुंबईत एल्फिन्स्टन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ही संस्था स्थापन केली या संस्थेचे अध्यक्ष तळखळकर हे होते.
- देश बांधवात ज्ञानाचा प्रसार करणे व सामाजिक जागृती घडवून आणणे या संस्थेचे उद्दिष्ट होते.
- 1849 : परमहंस सभा ,मुंबई  (भिकोबा चव्हाण, राम बाळकृष्ण जयकर यांचे सहकार्य)

## ग्रंथसंपदा :

1)मराठी भाषेचे व्याकरण

2) विद्येच्या लाभाविषयी

3)धर्मविवेचन

4)यशोदा पांडुरंग

5) मराठी नकाशाचे पुस्तक

6) आत्मचरित्र

- मराठी भाषेचे व्याकरणकार व गाढे विद्वान असलेले दादोबा 'मराठी भाषेचे पाणिनी' म्हणून ओळखले जातात.
- निधन : 17 ऑक्टोबर 1882


# भाऊ महाजन (1815-1890)

- मूळ नाव : गोविंद विठ्ठल कुंटे होते.
- जन्म : 1815 पेण (रायगड)
- बाळशास्त्री जांभेकरांचे ते वर्गमित्र होते.
- जांभेकरांचे दर्पण 1840 साली बंद पडले. ते द्वैभाषिक नियतकालिक होते. त्यातील इंग्रजी विभाग स्वतः जांभेकर बघत, तर मराठी विभाग भाऊ महाजन पाहत असत.

- 1841 :  प्रभाकर हे मराठी साप्ताहिक सुरू केले. त्यावेळी भाऊंचे वय 24 होते.
- या वृत्तपत्राने खंबीरपणे. ब्रिटिश राजवटीला विरोध केला. हे पत्र 21 वर्षे चालले.
- या पत्रातून आधुनिक शिक्षण, स्त्री शिक्षण व विधवा विवाहाविषयी त्यांनी आग्रहाची भूमिका घेतली. इथल्या सणांवर पैसे खर्च करण्याच्या समाजाच्या सवयीवर त्यांनी प्रभाकरमधून वेळोवेळी टीकापण केली.

- 1857 च्या उठावाबद्दलही त्यांनी लेखन केले.
- 10 एप्रिल 1842 पासून फ्रेंच राज्यक्रांतीची माहिती देणाऱ्या 25 लेखांची मालिका त्यांनी लिहिली.
- तसेच पाश्चात्त्यांच्या पोशाखाचे व चालीरीतींचे अनुकरण करू नये, अशा पद्धतीची मते त्यांनी प्रभाकरमधून मांडली.
- प्रभाकर हे पत्र महाराष्ट्रातील शहरी भागातच लोकप्रिय होते.

- 'ग्रेट ब्रिटन देशाची राजनीती 'हा प्रभाकर मधून प्रसिद्ध लेख लिहिला
- 1853 :  धूमकेतू हे साप्ताहिक सुरू केले
- 1854 : ज्ञानदर्शन त्रैमासिक सुरू केले



- जन्म: 18 एप्रिल 1858, मुरुड, शेरवली (जि. रत्नागिरी)
- शिक्षण : मुरूड (ता. दापोली) येथे प्राथमिक शिक्षण पूर्ण.
- मुरूड येथील सोमण गुरुजींकडून त्यांना निःस्वार्थीपणाची व लोकसेवेची प्रथम प्रेरणा मिळाली.

- स्त्री शिक्षण व स्त्री स्वातंत्र्याचा उद्गाता, विधवाविवाहाचा पुरस्कर्ता व उक्ती आणि कृती यामध्ये एकवाक्यता साधणारा ऋषितुल्य समाजसुधारक म्हणून महर्षी धोंडो केशव कर्वे (अण्णा) यांना भारतीय समाजसुधारणा चळवळीत मानाचे स्थान आहे.
- महर्षी कर्वे म्हणतात, 'स्त्रीशिक्षणासाठी केलेले विचार व उच्चार हिच परमेश्वराची प्रार्थना होय.'

- इयत्ता सहावीची परीक्षा सातारा येथे देण्यासाठी कर्वे मुरूड ते सातारा हे 125 मैलांचे अंतर कुंभार्ली घाटातून तीन दिवस पायी चालून गेले.

- 1873 : राधाबाईंशी विवाह.

- 1880 : मुंबईत मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण.
- महाविद्यालयीन शिक्षणासाठी कर्वे प्रथम विल्सन कॉलेजात व त्यानंतर एल्फिनस्टन कॉलेजमध्ये गेले.
- 1884: एल्फिनस्टन कॉलेजमधून (मुंबई) गणित विषयांत बी. ए. पदवी प्राप्त.
- काही काळ मुंबईतील मुलींच्या विद्यालयात गणिताचे शिक्षक म्हणून नोकरी.

- लोकमान्य टिळक फर्ग्युसन कॉलेजमध्ये गणिताचे प्राध्यापक होते.
- राष्ट्रीय चळवळीत पूर्णवेळ काम करण्यासाठी टिळकांनी या पदाचा राजीनामा दिला. त्यामुळे गोपाळ कृष्ण गोखले यात्ती कर्वे यांना दिळकांच्या जागी नियुक्त केले.
- 1891 ते 1914 या काळात कर्वे पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजमध्ये गणिताचे प्राध्यापक होते.

- 1891 :  राधाबाई यांचे निधन
- 1893 :   गोदुबाई यांच्याशी पुनर्विवाह केला.

- गोदुबाई या पंडिता रमाबाईंच्या शारदा सदनमधील विधवा परित्यक्ता आणि बाळकृष्ण जोशी यांच्या कन्या होत.
- गोदुबाईंना आनंदीबाई ऊर्फ बाया कर्वे या नावेही ओळखले जात असे.

- गोदुबाई या विधवेशी विवाह केल्याने मुरूडच्या जनतेने त्यांना वाळीत टाकले.
- गो. ग. आगरकरांनी कर्वेच्या पुनर्विवाहास पाठिंबा देताना त्यांच्या लग्नपत्रिकेवर सही केली होती.

# महर्षी कर्वे यांनी स्थापन केलेल्या विविध संस्था :

- 1893 : विधवा विवाहोतेजक मंडळ
- संस्थेमार्फत पुनर्विवाहाचे कुटुंब मेळावे भरविण्यास कर्वेंनी प्राधान्य दिले.
- अनाथ बालिकाश्रम : 1 जानेवारी 1899 पासून विधवा स्त्रियांसाठी (बालविधवांसाठी) 'अनाथ बालिकाश्रमाचे' कार्य सुरू.

- अनाथ बालिकाश्रम ही संस्था प्रथम पुण्यातील सदाशिव पेठेत गोरेंच्या वाड्यात स्थापन करण्यात आली होती. पुण्यात प्लेगची साथ आल्याने ही संस्था 1900 साली पुण्याजवळील हिंगणे येथे स्थलांतरित करण्यात आली.
- हिंगणे येथे रावबहाद्दर गणेश गोखले यांनी या संस्थेसाठी आपली सहा एकर जमीन व रु. 750 दिले.

'अनाथ बालिकाश्रम' या संस्थेस दामोदरपंत फाटक व श्रीमती यशोदाबाई फाटक या दाम्पत्याचे सहकार्य लाभले

- 1907 :  हिंगणे येथे महिला विद्यालयाची स्थापना.
- अण्णांची मेहूणी पार्वतीबाई आठवले या महिला विद्यालयाच्या पहिल्या विद्यार्थिनी.
- 1919 : महिला विद्यालयाचे रूपांतर हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेमध्ये झाले.

- स्त्रियांना मातृभाषा व इंग्रजी अशा दोन्ही भाषांतून शिक्षण देण्यात यावे असे कर्वेंचे मत होते.
- 1910 : निःष्काम कर्ममठ स्थापन केले
- निःष्काम कर्ममठाचे ब्रीद : 'समाजसेवा हा आमचा देव व सेवेच्या उपयुक्ततेविषयी खात्री ही आमची श्रद्धा.'
- उद्देश : लोकसेवेसाठी निःष्काम बुद्धीने तन, मन, धन अर्पण करणारे कार्यकर्ते निर्माण करणे हा निःष्काम कर्ममठाच्या स्थापनेमागील उद्देश होता.

- 3 जून 1916 : महिला विद्यापीठाची स्थापना.
- महाराष्ट्रातील तद्वतच भारतातील या पहिल्या महिला विद्यापीठात सुरुवातीस केवळ ५ विद्यार्थिनी होत्या.
- या विद्यापीठाच्या स्थापनेमागे जपानमधील महिला विद्यापीठाची प्रेरणा होती.
- महिला विद्यापीठाचे बोधवाक्य 'संस्कृता स्त्री पराशक्तीः'

- 1936 : ग्राम प्राथमिक शिक्षण मंडळे स्थापन केले
- 1944 : समता संघ:   जातिभेद व अस्पृश्यतेचे निर्मूलन करून समता प्रस्थापित करणे हे समता संघाचे उद्दिष्ट होते.
- जुलै 1947 मध्ये कर्वे यांनी 'मानवी समता' हे मासिक सुरु करून समता संघाची उद्दिष्टे स्पष्ट केली.

# महर्षी कर्वे यांच्या कार्याचा गौरव :

- D.Lit: बनारस विद्यापीठ (1942)
- पुणे विद्यापीठ (1951);
- S.N.D.T. महिला विद्यापीठ (1954) या विद्यापीठांनी कर्वेंना 'डि.लिट.' ही पदवी दिली.
- L.L.D. : मुंबई विद्यापीठाने 1957 साली कर्वेंना L.L.D. ही सर्वोच्च पदवी दिली.

- पुण्यातील डेक्कन एज्युकेशन सोसायटीने महर्षी कर्वे यांना आजीव सदस्यत्व बहाल केले होते.
- महर्षी कर्वे यांच्या 71 च्या वाढदिनी पुणे मनपाने पुण्यातील रस्त्यास 'महर्षी कर्वे रोड' असे नाव दिले.
- मुंबईतील 'क्विन्स रोड' या रस्त्याचे नामकरण 'महर्षी कर्वे रस्ता' असे करण्यात आले.

- व्यापार उत्तेजक सहकारी मंडळ, शिक्षण उत्तेजक मंडळ, मुरुड फंड स्थापना कर्वे यांनी केली।.
- 1915 यावर्षी पुणे येथील राष्ट्रीय सामाजिक परिषदेचे अध्यक्ष
- 1972 या वर्षी वसंत कानेटकर यांनी महर्षी कर्वे यांच्या जीवनावर हिमालयाची सावली हे नाटक लिहिले

- महर्षी कर्वे यांच्या जीवनावर प्रभाव टाकणारे व्यक्ती :  पंडिता रमाबाई ,ईश्वरचंद्र विद्यासागर, स्पेन्सर
- निधन : 9 नोव्हेंबर 1962 .
- 105 यावर्षी कर्वे यांचे निधन

# PYQ

**1) गोपाळ गणेश आगकरांशी पुढीलपैकी कोणती वृतपत्रे संबंधित होती ?**

**(Comb. B & C 2022)**

(a) केसरी व मराठा (b) वऱ्हाड समाचार (c) सुधारक (d) स्वराज्य

वरीलपैकी कोणते विधान / विधाने बरोबर आहे/त?

(1) (a) आणि (c) फक्त

(2) (a), (b) आणि (c) फक्त

(3) (b) आणि (d) फक्त

(4) (b), (c) आणि (d) फक्त

**2)जे. एस. मिल व एच. स्पेन्सर यांच्या लिखाणाने प्रभावित झालेले समाज सुधारक कोण? (ASO 2012)**

(1) महात्मा फुले (2) महर्षी कर्वे

(3) गोपाळ गणेश आगरकर (4) न्यायमूर्ती रानडे

**3)गोपाळ गणेश आगरकरांचा कशावर विश्वास नव्हता व म्हणून त्यांनी त्या विरोधात कार्य केले ? (ASO 2012)**

(a) पुनर्जन्म (b) जाती व्यवस्था

(c) बालविवाह (d) अस्पृश्यता

1)(b), (c ) 2)(b), (d)

3)(b), (c ), (d) 4)वरील सर्व

**4) खालील विवरणावरून व्यक्ती ओळखा : (Comb. C. 2022)**

(a) मराठीतील पहिले पत्रकार (b) अक्कलकोटच्या युवराजांचे शिक्षक

(c) मराठी वृत्तपत्राचे जनक (d) कुलाबा वेधशाळेचे संचालक

पर्यायी उत्तरे :

(1) दादाभाई नौरोजी (2) भाऊ दाजी लाड

(3) बाळशास्त्री जांभेकर (4) जगन्नाथ शंकर शेठ

**5)गोपाळ गणेश आगरकर यांनी शेक्सपियरच्या कोणत्या नाटकाचे मराठीत रूपांतर केले? (PSI 2012)**

(1) हॅम्लेट (3) द मर्चेंट ऑफ व्हेनिस

(2) मॅकबेथ (4) ज्युलियस सिझर

## पर्यायी उत्तरेः

| | (a) | (b) | (c ) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (2) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (3) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (4) | (iii) | (iv) | (i) | (ii) |

**6) 'श्रीपती शेषाद्री प्रकरण' ज्या समाजसुधारकाशी संबंधित होते. त्यांचे नाव ओळखा. (ASO 2016)**

(1) जगन्नाथ शंकर शेठ (2) बाळशास्त्री जांभेकर

(3) भाऊ दाजी लाड (4) छत्रपती शाहू महाराज

**7) जोड्या लावून योग्य पर्याय निवडा. (Comb. B & C 2022)**

(a) आचार्य बाळशास्त्री जांभेकर (i) सूरत येथे मानवधर्म सभेची स्थापना

(b) दुर्गाराम मंछाराम, दादोबा पांडुरंग (ii) ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या ताब्यात गेलेल्या श्रीपाद शेषाद्री परळीकर यांचे शुद्धीकरण

(c) अॅनी बेझंट (iii) नॉर्मल स्कूल व व्हिक्टोरिया इन्स्टिट्यूटची स्थापना

(d) केशवचंद्र सेन (iv) सेंट्रल हिंदू कॉलेजची स्थापना

**8)खालीलपैकी कोणत्या समाज सुधारकाने 'विधवा पुनर्विवाह संघटना' स्थापन केली?(2021)**

(1) महर्षी कर्वे (2) एम. जी. रानडे

(3) महात्मा फूले (4) वि. रा. शिंदे

**9)खालीलपैकी कोणते सन्मान महर्षी धोंडो केशव कर्वे यांना दिले होते ?(Comb. B & C 2018)**

(a) भारत रत्न (b) पद्म विभूषण

(c) डी. लिट. (d) एलएल. डी.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) फक्त (2) (a) आणि (b) फक्त

(3) (a), (b) आणि (c) फक्त (4) (a), (b), (c), (d)

**10) पुढील घटनांची त्यांच्या कालानुक्रमे यादी करा. (ASO 2014)**

(a) समता संघ (b) निष्काम कर्ममठ

(c) महिला विद्यालय (d) महिला विद्यापीठ

पर्यायी उत्तरे :

(1) (a) (b) (c ) (d)

(2) (d) (c ) (b) (a)

(3) (c ) (b) (d) (a)

(4) (b) (c ) (a) (d)

**11)धों. के. कर्वे यांचेबाबत काय खरे आहे ? (ASO 2012)**

(a) त्यांनी फर्ग्युसन कॉलेजची स्थापना केली.

(b) त्यांनी एस. एन. डी. टी. महिला विद्यापिठाची स्थापना केली.

(c) त्यांनी विधवेशी विवाह केला.

(d) त्यांनी समता संघाची स्थापना केली.

(e) त्यांना महाराष्ट्राचे मार्टिन ल्यूथर किंग म्हणून ओळखतात.

(f) त्यांना भारतरत्न किताब बहाल करण्यात आला

(1) (a), (b), (c), (d) (2) (b), (c), (d), (f)

(2) (3) (a), (b), (e), (f) (4) (c), (d), (e), (f)